प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

डिसेंबर 19, 2016

**वाढत्या आकाराच्या अंकांसह अंकफलकामध्ये 'एल' हे इनसेट अक्षर असलेल्या आणि इंटाग्लिओ छपाई नसलेल्या रु.50 च्या बँक नोटा आरबीआय वितरित करणार**

भारतीय रिझर्व बँक लवकरच, दोन्हीही अंक फलकांमध्ये 'एल' हे इनसेट अक्षर असलेल्या, व रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. उर्जित पटेल ह्यांची सही असलेल्या आणि मागील बाजूवर, '2016' हे छपाईचे वर्ष छापलेल्या, महात्मा गांधी मालिका 2005 मधील, रु.50 मूल्याच्या बँक नोटा वितरित करणार आहे.

ह्या नोटांमध्ये, अंकफलकात वाढत्या आकाराचे अंक असून त्या नोटा आमचे वृत्तपत्र निवेदन क्र.2016-2017/1403 दि. डिसेंबर 4, 2016 मार्फत कळविण्यात आलेल्या रु.50 च्या बँक नोटांप्रमाणेच असतील (अधिक माहितीसाठी आमचे वृत्तपत्र निवेदन क्र. 2016-2017/751 दि. सप्टेंबर 23, 2016 चा संदर्भ घ्यावा).

ह्या बँकेने ह्यापूर्वी दिलेल्या रु.50 च्या बँक नोटाही वैध चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/1578**